# बृहन्मुंबई महानगरपालिका

घनकचरा व्यवस्थापन दिनांक : 18.04.2020

महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसारित करावयाच्या जाहिरातीचा मसुदा

## वाहनचालक पदाची सरळसेवा भरती

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील घनकचरा व्यवस्थापन खात्याच्या परिवहन विभागाच्या आस्थापनेवरील वाहनचालक पदे सरळसेवेने भरण्यासाठी निवड यादी तयार करण्यासाठी उमेदवारांकडून स्पीड पोस्टाने किंवा ईमेलद्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत. पद भरतीकरिता पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

**एकूण पदे – 65 (वेतनश्रेणी M-12 - रु. 20,700 - 65,800) + अनुज्ञेय भत्ते.**

| अजा | अज | विजा (अ) | भज(ब) | भज(क) | भज(ड) | विमाप्र | इमाव | एसई बीसी | ईडब्लु एस | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 10 | 5 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 14 | 10 | 8 | 18 | 65 |

एकूण जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक आणि समांतर आरक्षणाचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

| तपशील | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | एसई बीसी | ईडब्लु एस | खुला | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | 3 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 6 | 3 | 5 | 8 | **27** |
| 30% महिला आरक्षण | 3 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 4 | 3 | 2 | 5 | **19** |
| माजी सैनिक 15% | 2 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 2 | 1 | 3 | **11** |
| प्रकल्पग्रस्त 5% | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 0 | 1 | **4** |
| खेळाडू 5% | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 0 | 1 | **4** |
| एकूण | **10** | **5** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **14** | **10** | **8** | **18** | **65** |

*उपरोक्त नमूद प्रवर्गनिहाय सामाजिक आणि समांतर आरक्षणात बदल झाल्यास त्याबाबतचे शुद्धीपत्रक बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसारीत करण्यात येईल.

विजा/भज व विमाप्र प्रवर्गाचा अनुशेष निरंक असल्याने सदर पदे भरता येणार नाहीत.

परिपत्रक क्र.एमबीसी/442 दि. 12.7.2018 सोबतच्या शासन निर्देशांनुसार वाहनचालक या संवर्गास दिव्यांग आरक्षण लागू नाही.

टीपः

- भरतीसाठी जाहीर केलेल्या रिक्त पदांच्या संख्येत वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे.
- रिक्त पदांच्या संख्येत बदल करण्याबाबत तसेच सामाजिक आणि समांतर आरक्षण बदलण्याचे अधिकार किंवा भरती प्रक्रिया अंशतः/पूर्णतः रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांना राहतील. याबाबत कोणालाही कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही.
- सर्व सामाजिक व समांतर आरक्षणाची पदे भरण्यासाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे प्रक्रिया राबविली जाईल.
- शासन निर्देशानुसार स्वातंत्र्यसैनिक व त्यांचे नामनिर्देशित यांना शासनाच्या अर्हता व सवलती विचारात घेऊन महापालिका सेवेत समाविष्ट करुन घेण्यात येईल.

3. उपरोक्त पदांसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता व इतर अर्हता:-

**अर्हता :**

अ) उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत 100 गुणाची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्च स्तर किंवा निम्न स्तर) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

ब) उमेदवाराजवळ प्रादेशिक परिवहन कार्यालयाचा (RTO) हलके/जड वाहन चालविण्याचा परवाना मनपा संकतस्थळावर ज्या दिनांकास सदर जाहिरात प्रसारीत करण्यात येईल, त्या दिनांकापासून किमान दोन वर्षापुर्वीचा वैध परवाना असणे आवश्यक आहे.

क) उमेदवारास शासकीय/निमशासकीय खात्यामध्ये नियमित / अनियमित (तदर्थ वा कंत्राटी) वाहनचालक पदावर हलके/जड वाहन चालविण्याचा किमान दोन वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.

ड) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत अगोदरच नसल्यास उमेदवाराचे वय 38 वर्षापेक्षा जास्त नसावे व मागासवर्गीय उमेदवाराच्या बाबतीत वय 43 वर्षापेक्षा जास्त नसावे. (शासन निर्णयानुसार वेळोवेळी होणारे बदल अमलांत आणण्यात येतील).

इ) माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग-३ व वर्ग-४ मधील पदांसाठी नेमणूकीकरीता विहित वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्ष इतकी राहील. तसेच अपंग, माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग-3 व वर्ग-4 मधील पदांसाठी नेमणूकीकरीता कमाल वयोमर्यादा 45 वर्षापर्यंत राहील.

फ) शासन निर्णयानुसार खेळाडूंची गुणवत्ता व पात्रता विचारात घेता वाहनचालक पदासाठी असलेली वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिल करण्यात येईल.

**ग**) अगोदरच महानगरपालिका सेवेत असलेल्या उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा नाही.

ह) **शारिरीक अर्हता** : पुरूष उमेदवारासाठी : किमान वजन 50 Kg. व उंची 157 cm.
स्त्री उमेदवारासाठी : किमान वजन 45 Kg. व उंची 150 cm. आवश्यक आहे

**4. निवडीचे निकष व कार्यपध्दती**

1. प्राप्त झालेल्या अर्जांमधून, सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार, विहीत केलेल्या अर्हता धारण करीत असलेल्या व अटी पूर्ण करीत असलेल्या उमेदवारांमधून, जाहिरातीत नमूद केलेल्या विहीत आरक्षणानुसार, रिक्त पदांच्या संख्येच्या पाचपट उमेदवारांना एस.एस.सी. परीक्षेत सर्व उत्तीर्ण विषयांमध्ये मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीनुसार व्यावसायिक चाचणीसाठी बोलाविण्यात येईल. (बेस्ट ऑफ फाईव्हची टक्केवारी विचारात घेतली जाणार नाही). दोन उमेदवारांना समान गुण असल्यास जो उमेदवार वयाने जेष्ठ आहे त्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल व तदनंतर प्रथम नावाच्या आद्याक्षरानुसार प्राधान्य दिले जाईल.

2. शासकीय/निमशासकीय खात्यामधील नियमित / अनियमित (तदर्थ वा कंत्राटी) वाहनचालक पदावर असताना हलके/जड वाहन चालविण्याच्या अनुभवानुसार व त्या अनुषंगाने सादर केलेल्या पुराव्यासापेक्ष खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील.

| वाहनचालक पदाचा सलग अनुभवाचा कालावधी | गुण (10 पैकी) |
|---|---|
| 2-3 वर्षे | 2 |
| 3-4 वर्षे | 4 |
| 4-5 वर्षे | 6 |
| 5-6 वर्षे | 8 |
| 6 वर्षे किंवा जास्त | 10 (कमाल) |

उपरोक्त गुण प्राप्त करण्यासाठी उमेदवारास Employees Provident Funds and Miscellaneous Provisions Act,1952 अंतर्गत नोंदणीकृत पुरावा व अनुभवाचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

3. व्यावसायिक चाचणी परीक्षेच्या वेळी उमेदवारांनी मूळ कागदपत्रे (सर्वसाधारण अटीमध्ये नमूद केल्याप्रमाणे) तसेच मूळ कागदपत्रांच्या स्वयं-साक्षांकित छायांकित प्रती (दोन संच) सोबत आणणे आवश्यक आहे. कागदपत्रांच्या छाननीनंतर, उमेदवाराची व्यावसायिक चाचणी (90 गुण) आणि पूर्वानुभव निकषाच्या एकूण गुणांच्या आधारे सामाजिक/समांतर आरक्षणनिहाय अंतिम निवड केली जाईल.

4. एका जागेसाठी दोन किंवा अधिक उमेदवारांस समान गुण मिळाल्यास खाली नमूद निकषांच्या आधारे गुणवता यादीतील प्राधान्यक्रम ठरविण्यात येईल.

1) हलके/जड वाहन चालक परवाना प्राप्त झाल्याच्या पृष्ठांकित केलेल्या दिनांकापासून मनपा संकेतस्थळावर ज्या दिनांकास सदर जाहिरात प्रसारीत करण्यात येईल, त्या दिनांकापर्यंतचा कालावधी
2) वय (मनपा संकेतस्थळावर ज्या दिनांकास सदर जाहिरात प्रसारीत करण्यात येईल त्या दिनांकाला वयाने जेष्ठ असलेल्या उमेदवाराचा क्रम वरचा राहील)
3) एस.एस.सी. परीक्षेत मिळालेल्या गुणांची टक्केवारी
4) प्रथम नावाच्या आद्याक्षरानुसार

5. उमेदवार मागासवर्गीय असेल तर त्याला खुल्या किंवा तो ज्या जातीच्या आरक्षणात मोडत असेल अशा एकाच प्रवर्गातून अर्ज करता येईल.

6. खुल्या प्रवर्गाच्या पदासाठी निवड झालेल्या मागास प्रवर्गातील उमेदवारांची केवळ खुल्या प्रवर्गाचे उमेदवार म्हणूनच निवड केली जाईल.
7. उच्च गुणवत्ताधारक मागासवर्गीय उमेदवारांची खुल्या प्रवर्गाच्या पदावर नेमणूक करण्यात येईल.
8. निवड करण्यात आलेल्या उमेदवाराची निवड वैद्यकीय तपासणी, शाळेचा दाखला, चारित्र्य पडताळणी व इतर कागदपत्रांच्या पडताळणीसापेक्ष असल्यामुळे उमेदवार निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल.

5. उपरोक्त निकषानुसार पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास निवडीचे निकष शिथिल करण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्तांना राहतील.

6. निवड केलेल्या उमेदवारास निवडीच्या दिवसापासून तीन दिवसांच्या आत नोकरीत दाखल होणे आवश्यक राहील अन्यथा त्यांना या नियुक्तीत स्वारस्य नाही असे समजण्यात येईल व त्याचे नाव निवड यादीतून वगळण्यात येईल.

**7. <u>अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सूचनाः</u>**

अर्ज स्पीडपोस्टने किंवा ईमेलद्वारे खालील पत्त्यावर स्वीकारले जातील.

| | |
|---|---|
| अर्ज स्पीडपोस्टने पाठविण्याचा पत्ता: | कार्यकारी अभियंता (परिवहन) शहर यांचे कार्यालय,<br>वरळी यानगृह इमारत, पहिला मजला,<br>ई मोझेस मार्ग, वरळी, मुंबई – 400018 |
| अर्ज पाठविण्याचा ईमेल ID | **mcgm.driver@mcgm.gov.in** |
| **अर्ज स्पीडपोस्टने किंवा ईमेलद्वारे स्वीकारण्याची अंतिम तारीख** | दि.**18.04.2020** पासून **28.04.2020** संध्याकाळी **5.30** पर्यंत |

अर्जाचा विहित नमुना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरून डाऊनलोड करून अर्जासोबत खालील आवश्यक कागदपत्रांच्या सुस्पष्ट व स्वसाक्षांकित छायांकीत प्रती जोडण्यात याव्यात. अर्ज संपूर्ण व अचुक भरावा.

1) एस.एस.सी किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रिका
2) प्रादेशिक परिवहन कार्यालयाचा (RTO) हलके/जड वाहन चालविण्याचा वैध परवाना
3) जन्माचा दाखला
4) शाळा सोडल्याचा दाखला
5) जातीचा दाखला/जात वैधता प्रमाणपत्र
6) समांतर आरक्षणांतर्गत अर्ज केल्यास त्यासंबंधातील प्रमाणपत्रे
7) छोट्या कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र
8) शासकीय/निमशासकीय खात्यामधील नियमित/अनियमित (तदर्थ वा कंत्राटी) वाहनचालक पदाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र व Employees Provident Funds and Miscellaneous Provisions Act,1952 अंतर्गत नोंदणीकृत पुरावा
9) इतर प्रमाणपत्र उदा. आधारकार्ड, पॅनकार्ड इ.

**1.** महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र.बीसीसी/२०११/प्रक्र १०६४/२०११/१६ ब दि.१२.१२.२०११ नुसार मागासवर्गीय उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत आपल्या जात/जमाती प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे बंधनकारक आहे. परंतु जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर उमेदवारास दिलेली नियुक्ती रद्द करण्यात येईल.

**2.** शासन अधिसूचना दि.28.03.2005 व त्याअनुषंगाने शासन परिपत्रक दि.01.07.2005 लहान कुटुंब असल्याबाबत विहित नमुन्यातील (पृष्ठ क्र.8) प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे. (अविवाहित अर्जदाराने सुध्दा सदरचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक आहे. त्यामध्ये त्याने/तिने लागू नाही असा शेरा नमूद करावा.)

**3.** ईमेलद्वारे अर्ज करताना हस्तलिखित अर्जासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या सुस्पष्ट व छायांकीत स्वसाक्षांकित प्रती स्कॅन करुन `PDF Format' मध्ये पाठविण्यात याव्यात. अर्जामधील संपुर्ण माहिती तसेच जोडलेल्या कागदपत्रांमधील माहिती वाचनीय (Legible) असेल, याची दक्षता उमेदवाराने घयावी. सदर अर्ज पाठविताना ईमेलचा व स्पीडपोस्टचा विषय खालीलप्रमाणे नमूद करावा.

**"APPLICATION FOR THE POST OF DRIVER – NAME OF APPLICANT"**

**6. <u>महत्वाच्या सूचना :</u> अर्ज स्पीडपोस्टने किंवा ईमेलद्वारे स्वीकारण्याची अंतिम तारीख:**
दि.**18.04.2020** पासून **28.04.2020** संध्याकाळी **5.30** पर्यंत

**7. स्पीडपोस्टच्या किंवा ईमेलच्या विलंबामुळे कोणतीही माहिती प्राप्त होण्यास किंवा कळविण्यास विलंब झाल्यास तर त्याची जबाबदारी बृहन्मुंबई महानगरपालिकेची राहणार नाही**.

**8.** उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वी तो संबंधित पदाची अर्हता पूर्ण करतो की नाही, याची खात्री करावी. उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्यास अपात्र ठरविण्यात येईल.

**9. <u>सर्वसाधारण अटी</u> :-**

**1.** निवड प्रक्रिया व निवड यादी कोणत्याही वेळी पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत.

**2.** उमेदवाराचा ई-मेल आयडी आणि पत्रव्यवहाराचा पत्ता (पिन कोड सह) सुस्पष्ट व पूर्ण असावा.

**3.** उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल, नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

**4.** इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदाकरिता विचार केला जाणार नाही.

**5.** उमेदवाराने खालील नमूद केलेल्या शैक्षणिक प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे यांच्या मूळ प्रती तसेच त्यांच्या छायांकित प्रती तपासणीसाठी नियुक्तीपूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

**i.** उमेदवारांनी शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्र, संबंधित गुणपत्रिका, जन्मदाखला, शाळा सोडल्याचा दाखला, सक्षम अधिका-यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र, जाती वैधतेचे प्रमाणपत्र , अधिवास प्रमाणपत्र,उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे अद्ययावत प्रमाणपत्र यांच्या मूळप्रती व स्वयंसांक्षांकित छायांकित प्रती.

**ii.** विवाहित महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहित महिला विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात.

**iii.** अ.जा. व अ.ज. प्रवर्गातील उमेदवार वगळता अन्य मागासप्रवर्गातील उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे अद्ययावत प्रमाणपत्र.

**iv.** महिला आरक्षणांतर्गत अर्ज करु इच्छिणा-या अजा/अज प्रवर्ग वगळता खुल्या वर्गासहीत इतर सर्व मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिका-याचे अद्ययावत प्रमाणपत्र नियुक्तीपूर्वी सादर करणे आवश्यक आहे. मात्र कोणत्याही परिस्थितीत नियुक्तीच्या वेळी सदर प्रमाणपत्र नसल्यास उमेदवाराचा विचार करण्यात येणार नाही. खुल्या वर्गातील महिला व अन्य समांतर आरक्षणांतर्गत अर्ज करु इच्छिणा-या उमेदवारांनी संबंधित समांतर आरक्षणाच्या दृष्टीकोनातून शासकीय निदेशानुसार सक्षम प्राधिका-याकडून प्राप्त केलेले प्रमाणपत्र व त्याच्या साक्षांकित छायाप्रती नियुक्तीपूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

**v.** महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र.बीसीसी-2018/प्र.क्र.581ए/16-ब दि. 04.07.2019 अन्वये दिलेल्या निर्देशानुसार सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्गातील (एस.ई.बी.सी.) पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**vi.** महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र.राआधो-4019/प्र.क्र.31/16-अ दि. 12.02.2019 अन्वये दिलेल्या निर्देशानुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांची (इ.डब्लू.एस.) पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**vii.** सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.पअंक-1010/717/प्र.क्र.322/10/16-अ दि. 16.08.2010 अन्वये एकदा उमेदवाराने समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास, त्या उमेदवारास समांतर आरक्षणाचा पुन्हा लाभ देता येणार नाही.

**viii.** उमेदवार नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियोक्त्याचे 'ना हरकत प्रमाणपत्र' आणणे आवश्यक आहे.

**ix.** उमेदवाराने अद्ययावत पासपोर्ट आकाराचे छायाचित्र अर्जावर जोडणे आवश्यक आहे.

**x.** फोटो असलेले ओळखपत्र उदा. आधारकार्ड, पॅनकार्ड इ. सोबत आणणे आवश्यक आहे.

**6.** उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास तो भरतीसाठी अपात्र ठरेल. उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास, उमेदवाराने त्याबाबतचा तपशील देणे आवश्यक आहे.

**7.** निवड झालेल्या उमेदवारांची बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही कार्यालय / रुग्णालयात नियुक्ती करण्यात येईल व त्यांची सेवा महापालिकेच्या कोणत्याही कार्यालयात बदलीयोग्य असेल. तसेच निवड झालेल्या उमेदवारास 'ड' संवर्गातील पदावरील नियुक्तीनंतर, महापालिकेच्या आवश्यकतेनुसार, तिन्ही पाळींमध्ये (Shift Duty) कामकाज करावे लागेल.

**8.** निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम, १९८९ तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम, १९९९ लागू होतील.

**9.** निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू होईल. सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (म्हणजे मुंबई महानगरपालिका निवृत्ती वेतन नियम १९५३) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

**10.** सदर भरतीअंतर्गत झालेली नियुक्ती तीन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल व तीन वर्षानंतरचे सेवासातत्य उमेदवाराच्या परिविक्षाधीन कालावधीतील कामगिरीवर अवलंबून असेल.

**11.** वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) या प्रवर्गाकरिता विहित केलेले आरक्षण त्या त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास आंतरपरिवर्तनीय आहे.

**12.** महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र.बीसीसी/२०११/प्रक्र १०६४/२०११/१६ ब दि.१२.१२.२०११ नुसार मागासवर्गीय उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत आपल्या जात/जमाती प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे बंधनकारक आहे. परंतु जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर उमेदवारास दिलेली नियुक्ती रद्द करण्यात येईल.

**13.** निवड झालेल्या उमेदवाराविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलीस स्टेशनकडून प्राप्त झाल्यानंतरच त्याची सदर पदावर नेमणूक केली जाईल.

**14.** उमेदवारांना व्यावसायिक चाचणी परीक्षेसाठी कोणताही भत्ता अथवा खर्च दिला जाणार नाही. उमेदवारांना नियुक्तीच्या कार्यवाहीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

**15.** उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे.

**16.** प्रकल्पग्रस्तांसाठी सन 2001 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.11 महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तिचे पुनर्वसन

अधिनियम 1999 नुसार शासनाने विहित केलेले नियम आणि बृहन्मुंबई महानगरपालिका ठराव क्र10.दि. 03.04.08 अन्वये मंजूर झालेली मार्गदर्शक तत्वे यानुसार नगरबाह्य विभागातील ज्या प्रकल्पग्रस्तांची जमीन बृहन्मुंबई महागनरपालिकेच्या जलप्रकल्पासाठी संपादित केली आहे अशा उमेदवारांमधून प्रकल्पग्रस्तांसाठीची आरक्षित पदे भरण्यात येतील.

**17.** शासन अधिसूचना दि.28.03.2005 व त्याअनुषंगाने शासन परिपत्रक दि.01.07.2005 लहान कुटुंब असल्याबाबत विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे. (अविवाहित अर्जदाराने सुध्दा सदरचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक आहे. त्यामध्ये त्याने/तिने लागू नाही असा शेरा नमूद करावा.)

**18.** प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार माननीय महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.

**19.** निवड यादी एक वर्षासाठी किंवा नवीन भरती प्रक्रियेसाठी जाहिरात देण्यात येईल त्या दिनांकापर्यंत या दोन्हीपैकी जे आधीचे घडेल त्या दिनांकापर्यंत विधिग्राहय ठरेल. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

**20.** शासन निर्णय क्र.राक्रीधो -2002/प्रक्र 68/क्रीयुसे/2 दि. 30.04.2005 व तदनंतर सुधारीत निर्णयानुसार गट 'ड' साठी क्रिडाविषयक अर्हता प्राप्त केल्याचे प्रमाणपत्र संचालक, क्रिडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रमाणित केलेले असावे. ते प्रमाणपत्र विधिग्राहय नसल्याचे निदर्शनास आल्यास त्याची नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. शासनमान्य क्रिडाप्रकारातील अत्युच्च गुणवत्ताधारक स्त्री व पुरुष खेळाडूंसाठी 5% समांतर आरक्षण ठेवण्यात येईल.

**21.** निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर महापालिकेचे निवासस्थान उपलब्ध करुन दिले जाणार नाही व निवासस्थान देण्याची जबाबदारी प्रशासनाची राहणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**22.** काही अपरिहार्य कारणास्तव व्यावसायिक व शारिरिक चाचणी परिक्षेच्या तारखांमध्ये बदल करावा लागल्यास त्याबाबतची माहिती बृहन्मुबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन प्रसिद्ध करण्यात येईल. याबाबत लेखी स्वरूपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही.

**23.** उमेदवाराने या भरतीप्रक्रिया संदर्भात वेळोवेळी प्रसिद्ध होणारी माहिती व सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध होणार असल्याने भरतीप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कृपया वरील संकेतस्थळ उमेदवारांनी वेळोवेळी पहावे.

**24**. उमेदवाराने केलेल्या अपुर्ण, अस्पष्ट, न वाचता येणा-या व नियत दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा सदर भरती प्रक्रियेसाठी विचार करण्यात येणार नाही. पोस्टाने किंवा ईमेलद्वारे केलेल्या अर्जासोबत जोडलेली आवश्यक कागदपत्रांची खातरजमा उमेदवाराने करावी. याबाबत झालेल्या त्रुटींबाबतची जबाबदारी सर्वस्वी उमेदवाराची राहील.

**25.** व्यावसायिक चाचणी परीक्षेचे वेळापत्रक व इतर माहिती वेळोवेळी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर **http://portal.mcgm.gov.in** प्रसारित करण्यात येईल.

**26.** निवड प्रक्रियेत अंतिम निर्णय घेण्याचे सर्व अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना राहतील.

**<u>समांतर आरक्षण</u>**

**अ)** शासन नियमाप्रमाणे महिलांसाठी 30% इतके समांतर आरक्षण ठेवण्यात येईल. तथापि, एखाद्या प्रवर्गात त्या प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्या प्रवर्गाच्या पुरुष उमेदवारांमधून भरण्यात येतील.

**ब)** उपरोक्त रिक्त पदांपैकी शासन निर्णय क्र.राक्रीधो-2002/प्रक्र 68/क्रीयुसे/2 दि. 30.04.2015 अन्वये शासनमान्य क्रिडाप्रकारातील अत्युच्च गुणवत्ताधारक स्त्री व पुरुष खेळाडूंसाठी 5% समांतर आरक्षण ठेवण्यात येईल.

**क)** प्रकल्पग्रस्तांसाठी सन 2001 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 11 महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम 1999 नुसार शासनाने विहित केलेले नियम आणि बृहन्मुंबई महानगरपालिका ठराव क्रमांक 10 दि. 03.04.2008 अन्वये मंजुर झालेले मार्गदर्शन तत्वे यानुसार नगरबाह्य विभागातील ज्या प्रकल्पग्रस्तांची जमीन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जल प्रकल्पात संपादित केली आहे अशा प्रकल्पग्रस्तांसाठी आरक्षित पदे भरण्यात येतील.

**ड)** माजी सैनिक व भुंकपग्रस्त यांची शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार सदर पदे भरण्यात येतील.

**9.<u>विशेष सूचना</u> :**

1. यापूर्वी संबंधित कार्यालयात वा अन्य ठिकाणी सादर केलेले/प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही, याची कृपया सर्वानी नोंद घ्यावी.
2. सेवायोजन कार्यालय/प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनीदेखील या जाहिरातीनुसार स्पीडपोस्ट किंवा ईमेलद्वारे अर्ज सादर करावा.
3. जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.
4. मध्यस्थ/ठग/मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणा-या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध रहावे.
5. सदर जाहिरात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

| | | |
|---|---|---|
| सही/-<br>प्रमुख अभियंता (घकव्य) | सही/-<br>सह-आयुक्त (घकव्य) | सही/-<br>सह आयुक्त (सा.प्र.) |
| सही/-<br>अति.आयुक्त (शहर) | सही/-<br>अति.आयुक्त (प.उप.) | सही/-<br>महानगरपालिका आयुक्त |

## महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना – अ

**प्रतिज्ञापत्र**

**नमुना-अ (नियम 4 पहा)**

मी, श्री / श्रीमती / कुमारी ______________________________________________

श्री.__________________________________________ यांचा / यांची मुलगा / मुलगी / पत्नी, वय ____________

वर्षे, राहणार _______________________________ याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

1. मी कामगार वाहनचालक या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.
2. आज रोजी मला _____________ (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक 28 मार्च, 2005 नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या _____________ आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा).

   1. ----------------------- 2.---------------------- 3.------------------------
3. हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक 28 मार्च, 2006 व त्यानंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे.

ठिकाण

अर्जदाराची सही

दिनांक

# MUNICIPAL CORPORATION OF GREATER MUMBAI
# बृहन्मुंबई महानगरपालिका

अलिकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचा फोटो चिटकवावा

प्रति
मान. महानगरपालिका आयुक्त
बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.

## वाहनचालक पदासाठी अर्ज

संपूर्ण नाव ________________________________________________________
Full Name in English ________________________________________________________

वडिलांचे किंवा पतीचे संपूर्ण नाव (मराठीमध्ये)__________________________________________
Father's or Husband's Name (English)_______________________________________________

कायमचा पत्ता -------------------------------------------------------------------
Permanent Address -----------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------

ईमेल आयडी ---------------------------

भ्रमणध्वनी क्र.--------------------------

लिंग (मराठीमध्ये) पुरुष/महिला
Gender (in English)-------- Male/Female-----------

वैवाहिक स्थिती अविवाहीत/विवाहीत

वजन (किलो)/Weight (kg) .............

उंची (सें.मी.)/Height (in centimeter) .............

जन्म तारीख ______________ दिनांक/महिना/वर्ष ...... ....... .......
Date of Birth Date/Month/Year ...... ....... .......

प्रादेशिक परिवहन कार्यालयाचा (RTO) हलके/जड वाहन चालविण्याच्या वैध परवान्याची माहिती:

1. परवाना क्रमांक:___________________
2. परवाना जारी केल्याचा दिनांक:________________
3. परवाना वैधता दिनांक: _____________________

शैक्षणीक अर्हता

| | शाळेचे नाव | शालांत परीक्षा मंडळाचे नाव | परीक्षेचे एकूण सर्व विषयांचे गुण/पैकी | टक्केवारी | मराठीचे गुण/पैकी | पास झाल्याचे वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| इयत्ता दहावी | | | | | | |

वाहनचालक पदावरील अनुभवाचा तपशील:

| अनु.क्र. | शासकीय/निमशासकीय कार्यालयाचे नाव | अनुभवाचा कालावधी | | एकूण कालावधी |
|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | |
| 1. | | | | |
| 2. | | | | |
| 3. | | | | |

आपण सामाजिक आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिता का ? असल्यास योग्य त्या प्रवर्गावर '√' अशी खूण करावी

| अजा | अज | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | एसई बीसी | ईडब्लयू एस | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

आपण समांतर आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिता का ? असल्यास योग्य त्या प्रवर्गावर '√' अशी खूण करावी

| ३०% महिला आरक्षण | भूकंपग्रस्त २% | माजी सैनिक १५% | प्रकल्पग्रस्त ५% (केवळ मनपा प्रकल्पांसाठी) | खेळाडू ५% |
|---|---|---|---|---|
| | | | प्रकल्पाचे नाव: | |

उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नवीनतम प्रमाणपत्र

जातवैधता प्रमाणपत्र (असल्यास सादर करावे)

आपणाकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र आहे का ?

स्थानिक पोलिस स्थानकाचा पत्ता: -------------------------------------

आपणाविरुध्द न्यायालयात यापूर्वी कोणत्याही प्रकारणी खटला दाखल करण्यात आला होता का ? होय/नाही

आपणाविरुध्द न्यायालयात खटला प्रलंबित आहे का ? होय/नाही

आपणाविरोधी कोणत्याही पोलीस ठाण्यात यापूर्वी कोणत्याही प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता किंवा कारवाई करण्यात आली होती का ? होय/नाही

DECLARATION/: I, hereby declare that all the statements made in this application are true and correct to the best of my knowledge and belief.

I understand that in the event of any information being found false or incorrect, my candidature for the applied post is liable to be cancelled/rejected at any stage of Recruitment/during the course of employment without any notice to me.

''मी, येथे असे प्रमाणित करतो/करते की, अर्जात दिलेली सर्व माहिती, माझ्या माहितीप्रमाणे बरोबर व खरी आहे. अर्जात दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास, माझी उमेदवारी भरतीच्या/नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर, पूर्वसूचना न देता रद्द करण्यात येईल.''

Date/दिनांक:

अर्जदाराची सही

सोबत (आवश्यक त्या कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित छायांकीत प्रती)

1) एस.एस.सी किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रिका
2) प्रादेशिक परिवहन कार्यालयाचा (RTO) हलके/जड वाहन चालविण्याचा वैध परवाना
3) जन्माचा दाखला
4) शाळा सोडल्याचा दाखला
5) जातीचा दाखला/जात वैधता प्रमाणपत्र
6) समांतर आरक्षणांतर्गत अर्ज केल्यास त्यासंबंधातील प्रमाणपत्रे
7) छोट्या कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र
8) शासकीय/निमशासकीय खात्यामधील नियमित/अनियमित (तदर्थ वा कंत्राटी) वाहनचालक पदाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र व Employees Provident Funds and Miscellaneous Provisions Act,1952 अंतर्गत नोंदणीकृत पुरावा
9) इतर प्रमाणपत्र उदा. आधारकार्ड, पॅनकार्ड इ.